आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ जून २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- भारत आत्मविश्वास आणि दृढनिश्चयानं प्रगती करत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं नीती आयोगाच्या नियामक परिषदेच्या बैठकीत प्रतिपादन, विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी महाराष्ट्र पूर्ण ताकदीनं काम करत राहील अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही

- महाराष्ट्र एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यापर्यंत वाढवण्याची परिवहन मंत्र्यांची घोषणा, घरभाडे भत्त्यातही वाढ करण्याचा निर्णय

- ओमानच्या किनारपट्टीवर अमेरिकी सैन्यानं तेलवाहू जहाजावर केलेल्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू, भारताकडून तीव्र निषेध

**आणि**

- महिलांची आयसीसी टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धा उद्यापासून इंग्लंडमध्ये सुरु होणार

**<><><><><>**

सद्यस्थितीत जग अनिश्चितता आणि अस्थिरतेच्या काळातून जात असतानाही, भारत आत्मविश्वास आणि दृढनिश्चयानं प्रगतीपथावर वाटचाल करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं नीती आयोगाच्या नियामक परिषदेची अकरावी बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. आज देश विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेनं वाटचाल करत आहे, अशावेळी केंद्र आणि राज्य सरकारांची सामूहिक जबाबदारी आणखी वाढली असल्याचंही ते म्हणाले. राज्यांमधले परस्पर संबंध हे सहकार्य, संवाद आणि देवाणघेवाण यावर आधारित असायला हवेत असं आवाहन त्यांनी केलं. विकसित भारताचं ध्येय साध्य करण्यासाठी राज्यांना

परस्परांच्या कल्पनांची देवाणघेवाण करता यावी तसंच एकत्रितपणे काम करता यावं यासाठी नीती आयोग हे सहकार्याचं व्यासपीठ म्हणून मोठी भूमिका बजावू शकते असं त्यांनी सांगितलं.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील या बैठकीला उपस्थित होते. आज भारत स्पर्धा करण्यासोबतच, जगातल्या प्रत्येक प्रमुख अर्थव्यवस्थेला मागे टाकत असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस देखील या बैठकीला उपस्थित होते. विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी महाराष्ट्र पूर्ण ताकदीनं काम करत राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.

दोन हजार सत्तेचाळीसच्या विकसित भारतासाठी सर्वसमावेशक मानवी विकास ही या बैठकीची संकल्पना होती. देशभरात उद्योजकतेला चालना देणं, कौशल्य विकासात वृद्धी घडवणं आणि रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण करण्यासाठीच्या उपाययोजना या मुद्यांवर या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीच्या निमीत्तानं देशभरातल्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल एकत्र आले होते.

**<><><><><>**

जी-सेवन समूहाच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १४ ते १८ जून दरम्यान फ्रान्स आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव सीबी जॉर्ज यांनी बातमीदारांना आज नवी दिल्ली इथं ही माहिती दिली.

जी-सेवन समूहाची ही ५२ वी शिखर परिषद १५ ते १७ जुन दरम्यान भरणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिषदेत सलग सातव्यांदा सहभागी होणार आहेत. या भेटीदरम्यान मोदी विविध राष्ट्रप्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्याप्रमाणे, ५३ टक्क्यावरून ५८ टक्क्यापर्यंत वाढवण्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज केली. यासोबतच कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आज मुंबईत एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित बैठकीत ही घोषणा करण्यात आली. या बैठकीत विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक आणि प्रशासकीय मागण्यांवर चर्चा झाली.

यावेळी सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तात्काळ प्रभावानं एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

**<><><><><>**

विधानसभा सदस्यांमार्फत निवडून दिल्या जाणाऱ्या राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीत राजेंद्र जैन हे बिनविरोध निवडले गेल्याचं निवडणूक निर्णय अधिकारी मेघना तळेकर यांनी जाहीर केलं. या जागेसाठी राज्यातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राजेंद्र जैन यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता.

**<><><><><>**

आगामी विधानपरिषद निवडणुकीत नाशिक मतदारसंघातून उभे असलेले अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत यांनी आज गिते यांच्यासोबत बैठक घेतल्यानंतर वार्ताहर परीषदेत ही घोषणा केली.

**<><><><><>**

ओमानच्या किनारपट्टीवर काल रात्री अमेरिकी सैन्यानं एमटी सेटबेलो या पालाऊ देशाचा ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजावर केलेल्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय जहाजबांधणी मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी आज ही माहिती दिली. सागरी क्षेत्राशी संबंधित क्षेत्राचं हे मोठं नुकसान असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या जहाजाच्या कर्मचाऱ्यांमध्ये एकूण २४ भारतीय खलाशी होती, त्यापैकी २१ जणांना वाचवण्यात ओमानच्या बचाव पथकाला यश आलं. या हल्ल्यात बचावलेल्या २१ खलाशांना मायदेशी आणण्याचे तसंच मृतांचं पार्थिव लवकरात लवकर भारतात पाठवण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले गेले आहेत.

आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेनं या हल्ल्याचा निषेध केला आहे.

दरम्यान केंद्र सरकारनं अमेरिकेच्या राजदूतांना पाचारण करून या हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवला आहे. परराष्ट्र व्यमंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी नवी दिल्लीत आंतरमंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. आणखी एका घटनेत उत्तर ओमानमधील शिनास बंदराजवळ एमटी जलवीर या व्यापारी तेलवाहू जहाजाला आग लागल्यानं आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. गिनी-बिसाऊ या देशाच्या ध्वजाखाली कार्यरत असलेल्या या जहाजावर सुमारे २० भारतीय खलाशी असल्याचं वृत्त आहे. ओमानच्या अधिकाऱ्यांनी तातडीनं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं आहे. या आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

**<><><><><>**

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला उद्यापासून इंग्लंडमध्ये सुरुवात होत आहे. स्पर्धेचा पहिला सामना इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात बर्मिंगहममध्ये एजबॅस्टन इथे होईल. या स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच १२ संघ सहभागी होत असून, सात मैदानांवर एकूण ३३ सामने खेळवले जाणार आहेत. महिनाभर चालणारी ही स्पर्धा इंग्लंड आणि वेल्समध्ये खेळवली जाणार

असून, ५ जुलै रोजी ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर अंतिम सामना होणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ येत्या रविवारी पाकिस्तानविरुद्ध आपला पहिला सामना खेळेल.

**<><><><>**

सिडनी इथं सुरु असलेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधू आणि तन्वी शर्मानं आज महिला एकेरीच्या उपांत्य-पूर्व फेरीत आगेकूच केली. पी व्ही सिंधूनं भारताच्या ईशाराणी बरुहाचा २२-२०, २१-१२ असा, तर तन्वी शर्मानं मालविका बनसोडचा २१-१३, २१-१५ असा पराभव करत उपांत्य-पूर्व फेरीत धडक मारली.

**<><><><>**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धा २०२६ ला आजपासून सुरुवात होत आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे यंदाच्या विश्वचषक स्पर्धेचे यजमान आहेत. मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिकेतल्या सामन्यानं स्पर्धेला सुरुवात होईल. त्यानंतर आजच संध्याकाळी दक्षिण कोरिया आणि चेकिया यांच्यात सामना होणार आहे. यंदाच्या स्पर्धेत ४८ संघ सहभागी झाले असून, तीनही यजमान देशांना स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे.

**<><><><>**

सामाजिक कार्यकर्ते पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त, संरक्षण मंत्रालयानं त्यांना एक अनोखी भेट दिली आहे, १९६५ आणि १९७१ च्या युद्धांमध्ये प्रत्यक्ष लढलेला 'टी-५५' रणगाडा. अण्णा हजारे येत्या १५ तारखेला ९० वर्षांचे होत आहेत. याचाच एक भाग म्हणून सरकारनं त्यांना भेट दिलेला हा रणगाडा आज राळेगण सिद्धी इथं दाखल झाला असून, त्याचं अधिकृत अनावरण १५ जून रोजी होणार आहे.

**<><><><>**

काँग्रेसचे सर्व सरचिटणीस, विविध राज्यांचे प्रभारी आणि प्रदेशाध्यक्ष यांची बैठक आज नवी दिल्लीत झाली. या बैठकीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, काँग्रेसचे सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा, के. सी. वेणुगोपाल, जयराम रमेश, भूपेश बघेल, तसेच विविध राज्यांचे प्रभारी आणि प्रदेशाध्यक्ष सहभागी झाले होते. या बैठकीत सध्याची राजकीय परिस्थिती आणि पक्षाची पुढची वाटचाल यांबाबत चर्चा करण्यात आली.

<><><><><>

काँग्रेस नेत्या मीनाक्षी नटराजन यांनी, त्यांचा राज्यसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज फेटाळण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर, मनमानी आणि पूर्वग्रहानं ही कारवाई केल्याचा दावा त्यांनी आपल्या याचिकेत केला आहे. न्यायालयात या प्रकरणी उद्या सुनावणी होणार आहे.

//<><><><><>//